# अहवाल २०१८-१९

## युवतीसभा

प्रमुख: डॉ. आशा काटे
सदस्य: प्रा. डॉ. मंजू तरडेजा.

दि. १० ऑगस्ट २०१८ रोजी प्रा. माया जगताप यांच्या हस्ते युवतीसभेचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. सूर्यवंशी, उपप्राचार्य डॉ. शुभदा रावळ, प्रा. एम. एल. पाटील, प्रा. मंगेश पाटील उपस्थित होते.

१५ सप्टेंबर रोजी युवतीसभे अंतर्गत मुलींसाठी फ्री हेल्थ चेकअप आयोजित करण्यात आले.

दि. २९ ऑगस्ट २०१८ समाजकार्य महाविद्यालय मोराणे युवतीसभेअंतर्गत व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेसाठी वीस विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. दि. २५ जाने. २०१९ युवती सभे अंतर्गत व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा एस. एस. व्ही. पी. एस. महाविद्यालय धुळे येथे आयोजित करण्यात आले त्यात दहा विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

२९ जाने. २०१९ रोजी महाविद्यालयात कला महोत्सवानिमित्त साडीडे, रांगोळी, पाककला, मेहंदी विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. तसेच काव्यवाचन स्पर्धेत विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

दि. ३ जाने. २०१९ रोजी सावित्रीबाई फुले जयंती निमित्त विद्यार्थिनींसाठी समुपदेशन वर्ग प्रा. वैशाली पाटील व प्रा. डॉ. विजय भुजाडे यांनी विद्यार्थिनींचे समुपदेशन केले.

Scanned with CamScanner